शालार्थ प्रणाली पुर्नविकासित करण्यासाठी नियुक्त Maha-IT संगणक तज्ञांना सेवा शुल्क अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१५१९/प्र.क्र.३ /संगणक
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक:- १६ ऑगस्ट, २०१९.

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः मातंसं-१७१७/प्र.क्र.१११/३९, दि.९ एप्रिल, २०१९.
२) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१५१९/प्र.क्र.३/संगणक, दि.९ एप्रिल, २०१९.
३)आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.आशि/२०१९/Maha-IT Invoice/ आस्था क्र.१४३/४७४१,दि.५ ऑगस्ट, २०१९.

प्रस्तावना :-

शालार्थ प्रणाली विकसीत करण्यासाठी Maha-IT संगणक तज्ञ नियुक्त केले असून, संदर्भ क्र.२ अन्वये Maha-IT च्या संगणक तज्ञांना नोव्हेंबर, २०१८ ते मार्च, २०१९ या कालावधीतील सेवाशुल्क अदा करण्यात आलेले आहे. संदर्भ क्र.१ नुसार तांत्रिक मनुष्यबळाचे दर सुधारित करण्यात आलेले आहेत. सदरच्या सुधारित दरानुसार Maha-IT च्या संगणक तज्ञांना सेवाशुल्क अदा करण्याबाबत आयुक्त, शिक्षण, पुणे यांच्या संदर्भ क्र.३ च्या अनुषंगाने ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

२. संदर्भ क्र.१ मधील सुधारीत दरपत्रकानुसार शालार्थ प्रणालीचे कामकाज पाहणाऱ्या Maha-IT संगणक तज्ञांचा वेतनाचा तपशिल परिशिष्ट “अ” मध्ये सोबत जोडला आहे.

३. शालार्थ प्रणालीसाठी नियुक्त केलेल्या Maha-IT संगणक तंज्ञाचे वेतन रु. 68,71,809 /- सोबत जोडलेल्या **परिशिष्ट “अ**” नुसार अदा करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. यावरील खर्च मागणी क्रमांक. ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण,८०-सर्वसाधारण शिक्षण,पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२ H ४५४) ३१ सहायक अनुदाने या लेखाशिर्षातून सन २०१९-२० च्या उपलब्ध तरतुदीमधुन भागविण्यात यावा. यासाठी आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी व सहायक संचालक, (लेखा)

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियमपुस्तिका-२०१५ दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील उपविभाग-२ मधील अनुक्रमांक २७अ मधील नियम क्र.७६ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१६१५०२२१४१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.08.16 15:12:54 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) अ.मु.स., वित्त विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२) अ.मु.स., शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्विय सहायक मंत्रालय, मुंबई.
३) प्र.स., माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
४) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.,
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
८) निवडनस्ती/ संगणक कक्ष.

परिशिष्ट- "अ"

माहे १ एप्रिल, २०१९ ते ३० सप्टेंबर, २०१९ कालावधीसाठी देय शुल्काचा तपशील:-

Sr. No.	Manpower Description	No.of Persons	Required Period (In Months/ Days)	Rate Per Months(Exclusive of Service Tax) (Rs.)	Total Amount (in Rs.)
		(A)	(B)	(C)	(D)
1.	Project Manager	**1**	(1 April,2019 To 30 Sep. 2019)	2,95,612.00	17,73,672
2.	Business Analyst	1	(1 April,2019 To 30 Sep. 2019)	1,29,908.00	7,79,448/-
3.	Sr.Software Developer	2	(1 April,2019 To 30 Sep. 2019)	1,25,738.00	15,08,856/-
4.	Software Developer	1	(1 April,2019 To 30 Sep. 2019)	62,869.00	3,77,214/-
5.	Network Administration	1	(1 April,2019 To 30 Sep. 2019)	1,05,209.00	6,31,254/-
6.	Database Administrator	1	(1 April,2019 To 30 Sep. 2019)	83,398.00	5,00,388/-
7.	Software Tester	1	(1 April,2019 To 30 Sep. 2019)	50,039.00	3,00,234/-
	६ महिन्याचे शुल्क (1)Total Amount (Rs.)				**58,71,066**
	(2)Central Goods & Services Tax @ 9.00% on (1)				**5,28,396**
	(3)State Goods & Services Tax @ 9.00% on (1)				**528396**
	Gross Toal (1+2+3)				**69,27,858**
	शासन निर्णय दि.९.४.२०१९ अन्वये Maha-IT संगणक तज्ञांना दि.१९.११.२०१८ ते दि.३१.०३.२०१९ या कालावधीसाठी देण्यात आलेल्या सेवा शुल्कातील शिल्लक रक्कम				**56,049**
	नक्त देय रक्कम				**68,71,809**